RNI No. MAHBIL /2009/36619

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ८, अंक ८३] सोमवार, डिसेंबर २६, २०२२/पौष ५, शके १९४४ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ११.००

असाधारण क्रमांक १२८

प्राधिकृत प्रकाशन

### जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, पालघर

**मुंबई-अहमदाबाद अतिजलद रेल्वे प्रकल्पासाठी भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अंतर्गत कलम ११(१) ची**

**अधिसूचना**

क्रमांक डीपी/भूसं-३/हा.रेल/अधिसूचना ११(१)/कावि-११६३/२०२२.—भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) मधील कलम ३ च्या खंड (इ) च्या द्वारे प्रदान करण्यांत आलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकिर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२/दिनांक १९ जानेवारी २०१५(यात या पुढे जिचा निर्देश उक्त अधिसूचना असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसुचित केले आहे, उक्त अधिनियमाचा कलम ३ खंड (झेड अ) मध्ये व्याख्या केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टर अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात अशा जिल्ह्याचा अधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समूचित शासन असलेल्या पालघर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास या सोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त जमीन असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त सार्वजनिक प्रयोजन असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे. अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते. ज्याचे स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसुची दोन मध्ये दिलेले आहे आणि म्हणूनच उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदी अन्वये या द्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमिसंपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तिंचे विस्थापन करण्यास भाग पडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील यासोबत जोडलेल्या अनुसुची पाच मध्ये दिलेला आहे;

त्याअर्थी, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ चा पोट-कलम (४) नुसार कोणतीही व्यक्ती ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल, त्या कालावधी पर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही:

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमुद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईलः

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्याकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) नुसार जिल्हाधिकारी भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम १४ (या पुढे ज्यांचा निर्देश उक्त नियम असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम १० च्या उप नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्यावती करण्याचे काम हाती घेणार असल्याचे व पुर्ण करणार असल्याचे देखील घोषीत करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ चा खंड (छ) समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्य पार पाडण्यासाठी अपर निवासी उपजिल्हाधिकारी,पालघर यांस पदनिर्देशित केले आहे.

## अनुसूची - एक

## जमिनीचे वर्णन

गावाचे नाव - साखरे, तालुका - डहाणू, जिल्हा - पालघर

| अ.क्र. | भूमापन/गट/सर्व्हे नं. | संपादित क्षेत्र (हे.आर.) मध्ये |
|---|---|---|
| १ | २३४ | ०.०६.१० |
| २ | २३३ | ०.००.२६ |
| ३ | १९३ | ०.०८.५४ |
| ४ | २११ | ०.५५.६१ |
| ५ | २१२ | ०.०२.९० |
| ६ | २१३ | ०.०१.७८ |
| ७ | २२६ | ०.००.७१ |
| **एकूण** | | **०.७५.९०** |

## अनुसूची - दोन

## सार्वजनिक प्रयोजन स्वरुपात विवरण

| | |
|---|---|
| प्रकल्पाचे नाव : | मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल प्रकल्प<br>ता. डहाणू जि.पालघर |
| प्रकल्पाचे वर्णन : | मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल प्रकल्प हा जवळपास ५०८.१० कि.मी.प्रकल्प महाराष्ट्रात एकुण १५५.७६ कि.मी. असुन केंद्रशासित प्रदेश दादरा आणि नगर हवेली मध्ये -४.३० कि.मी. व गुजरातमध्ये -३४९.०३७ कि. मी. आहे |
| समाजाला मिळणारे लाभ : | मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल प्रकल्पामुळे जलदगती रेल्वेप्रकल्प बांधकाम करणे, त्याचा वापर करणे व देखभाल करणे याकामी रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.<br>स्थानिक लोकांना त्यांचे कौशल्य आणि अनुभव यानुसार त्या जागेतील प्रचलित नियमानुसार नोकरीच्या संधी मिळतील. तसेच नवीन स्थानकांवर स्थानिक लोकांना नविन बाजारपेठ आणि उद्योजकतास संधी मिळतील. तसेच त्या प्रकल्पामुळे प्रवासी वाहतूकीत वाढ सुरक्षीत आणि जलद प्रवास, भौगोलिक आणि सामाजिक दृष्टीने सर्वंकष विकास, मोठया प्रमाणात रोजगार निर्मीती पर्यावरण स्थिरता हया बाबी अभीप्रेत आहेत. |

## अनुसूची - तीन

### बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणार कारणे.

१. प्रकल्पाच्या बांधकाम

२. प्रकल्पाच्या परिचालक

३. प्रकल्पाच्या देखभालीखाली

या कारणाकरीता जमिनीची आवश्यकता.

## अनुसूची - चार

### (सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करण्याऱ्या अधिकाऱ्याने दिलेला सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश)

शासन महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई-३२ यांनी त्यांचे अधिसूचना क्र. संकिर्ण -०१/२०१५ प्र.क्र.३/अ-२ दि. १३.०३.२०१५ द्वारे भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ ( २०१३ चा ३० ) यामध्ये कलम १० क समाविष्ठ केले असून त्यामध्ये अशी तरतूद केली आहे की, समुचित शासनाला जनहिताच्या दृष्टीने अधिसूचनेद्वारे, उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोन व प्रकरण तीन यांच्या तरतुदी लागू करण्यापासून सुट देता येते. त्यानुसार **महाराष्ट्र शासन राजपत्र**, असाधारण क्रमांक १२९, दिनांक ३० मे २०१९ नुसार **उक्त प्रकल्पाला** जनहिताच्या दृष्टीने **लोकहितकारी प्रकल्प असल्या कारणे**, प्रकरण दोन आणि प्रकरण तीन च्या तरतुदी लागु करण्यापासुन उक्त प्रकल्पाला सूट देण्यात आली आहे.

## अनुसूची - पाच

### नियुक्त केलेल्या प्रशासनाचा तपशील

| | | |
|---|---|---|
| अ. | प्रशासन म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम | उपजिल्हाधिकारी ( पुनर्वसन ), पालघर |
| ब. | प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता | उपजिल्हाधिकारी ( पुनर्वसन ), पालघर<br>जिल्हा मुख्यालय, पालघर, कोळगाव, पालघर बोईसर रोड,<br>ता. जि. पालघर, ४०१ ४०४ |
| क. | ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे. त्या अधिसूचनेचा तपशील | जिल्हाधिकारी पालघर यांचेकडील क्रमांक/पुनर्वसन/NHSRCL/आदेश टे-२/कावि-५२३/२०२१ दिनांक २४ नोव्हेंबर २०२१ |

सदर अधिसूचनेद्वारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे किंवा आवश्यक्यता भासण्याचा संभव असल्याचे कायद्याचे कलम ११ चे उप-कलम ( १ ) खाली अधिसुचीत करण्यात आले आहे. प्रारंभिक अधिसूचनेच्या तारखेपासुन ६० दिवसाच्या आत अपर निवासी उपजिल्हाधिकारी, पालघर, जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर यांचे कार्यालयात आक्षेप नोंदविता येईल.

पालघर,

दिनांक २६ डिसेंबर २०२२.

**सुरेंद्र नवले,**
सक्षम प्राधिकारी,
मुंबई-अहमदाबाद अतिजलद रेल्वे प्रकल्प,
तथा अपर निवासी उपजिल्हाधिकारी,पालघर.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.